जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३९५ दिनांक - २७/०५/२०२३**

**दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर**

## देशी हातबनावटीचे पिस्टल बाळगणा-या इसमास केले जेरबंद

दि. २६/०५/२०२३ रोजी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ कडील अधिकारी व अंमलदार असे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत वाहनचोरी प्रतिबंधकच्या अनुषंगाने गस्त घालीत असताना गस्ती दरम्यान स्टाफमधील पोलीस अंमलदार श्रीकांत दगडे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराने माहिती दिली की, एक इसम हा सिंहगड रोड वर असलेल्या टि अॅन्ड मी हॉटेल जवळ उभा असुन त्याचे जवळ एक लोखंडी पिस्टल आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाली.

सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे खात्री झाल्याने स्टाफचे मदतीने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी करुन सदर इसमास त्याचे नाव, पत्ता विचारता त्याने आपले नाव व पत्ता **ऋषिकेश लक्ष्मण शिंदे, वय- १९ वर्षे, रा. साईनगर, हिंगणे खुर्द, देशमुख प्लाझा बिल्डींग समोर, सिंहगड रोड, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेता त्याचेजवळ एक देशी बनावटीचे पिस्टल व ०१ जिवंत राऊंड व ०१ मॅग्झीन असा एकुण किं रु ४१,७००/- रू.चा अग्निशस्त्र असलेला माल विना लायसन्स व बेकायदेशीररित्या जवळ बाळगताना मिळुन आला.त्याचेजवळ मिळुन आलेल्या लोखंडी पिस्टलबाबत चौकशी करता सदरचे पिस्टल हे त्याने त्याचे ओळखीचा मित्र ओंमकार लोहकरे,रा.धायरी गांव पुणे याचे कडून विकत घेतल्याचे सांगितल्याने वर नमुद ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाविरुध्द व त्याचे ओळखीचा मित्र ओंमकार लोहकरे यांचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे आर्म अॅक्ट कलम ३ सह २५ व महा पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री. संदीप कर्णिक,मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १, श्री. सुनिल पवार, यांचे मार्गदर्शना खालील दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक-१, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ब्रम्हानंद नाईकवाडी, नरेंद्र पाटील, पोलीस अंमलदार श्रीकांत दगडे, महेश पाटील, शिवाजी सातपुते, रविंद्र लोखंडे, बाळु गायकवाड व नारायण बनकर दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केली आहे.

